


■ २२ कॅरेट सोने दर : १,२०,९००/- ■ चांदी दर : १,७५,०००/-

शब्दांना सत्याची धार

# प्रहार

दै प्रहारच्या सर्व वाचक, हितचिंतक, जाहीरातदारांना दिपावली पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा!

बुधवार २२ ऑक्टोबर, २०२५ | RNI Reg.No.: एमएएचएमएआर/२००८/३३७८७ ● वर्ष २१ ● अंक ३३९ ● पाने ८ ● ₹ ५.०० | www.prahaar.in | epaper.prahaar.in

# ‘स्वदेशी स्वीकारा, प्रत्येक भाषेचा आदर करा’

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे दिवाळीनिमित्त देशवासियांना आवाहन

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**



‘स्वदेशी स्वीकारा, प्रत्येक भाषेचा आदर करा असे आवाहन करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आरोग्याला प्राधान्य द्या, असा सल्ला दिवाळीनिमित्त देशवासियांना मंगळवारी दिला.

भारतात दिवाळीचा सण मोठ्या उत्साहात आणि थाटामाटात साजरा केला जात आहे. या दिवाळीच्या निमित्ताने पंतप्रधान मोदी यांनी शुभेच्छा देत देशवासियांना एक खास पत्र लिहिले. या पत्राच्या माध्यमातून मोदींनी जनतेशी संवाद साधत दिवाळीचा सण ऊर्जा, उत्साह आणि देशाच्या कामगिरीवर चिंतन करण्याचा काळ असल्याचे म्हटले आहे.

मोदींनी पत्राच्या माध्यमातून देशवासियांना फक्त दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या नाहीत, तर एक खास आवाहनही केलं आहे. स्वदेशीचा स्वीकार करा, असे आवाहन करत ऑपरेशन सिंदूरच्या यशाबाबतही त्यांनी भाष्य केले. तसेच अयोध्येत राम मंदिर बांधल्यानंतर ही दुसरी दिवाळी असल्याचे सांगत अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी धार्मिकता आणि धैर्य यावरील श्री रामांच्या शिकवणींचा संदर्भही मोदींनी सांगितला.

**अन्यायाचा बदला घेतला**

पंतप्रधान मोदींनी पत्रात म्हटले की, भगवान श्री राम आपल्याला धार्मिकतेचे रक्षण करायला शिकवतात, तसेच अन्यायाविरुद्ध लढायलाही शिकवतात. याचे एक ज्वलंत उदाहरण आपण काही महिन्यांपूर्वी ऑपरेशन सिंदूर दरम्यान पाहिले. ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताने अन्यायाचा बदला घेतला” ते पुढे लिहितात,“ही दिवाळी खास आहे कारण देशातील अनेक जिल्ह्यांमध्ये, दुर्गम भागात पहिल्यांदाच दिवाळीचे दिवे लावले जातील. हे असे जिल्हे आहेत. ज्या ठिकाणी नक्षलवाद आणि माओवाद्यांचा नायनाट करण्यात आला आहे. अलिकडच्या काळात आपण पाहिले असेल

(पान २ वर)


# दीपावलीच्या विक्रमी विक्रीतून अर्थव्यवस्थेला बळ!

## ६ लाख कोटी रुपयांची ऐतिहासिक उलाढाल; केवळ सोने-चांदीवर ६०,५०० कोटींचा खर्च

**नवी दिल्ली**

यंदाच्या दीपावली सणासुदीच्या काळात भारतात विक्रमी ६.०५ लाख कोटी रुपयांची उलाढाल झाली आहे. व्यापारी संघटना 'कॅट'ने (कन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स) मंगळवारी ही माहिती दिली. या एकूण विक्रीपैकी ५.४० लाख कोटी रुपयांच्या वस्तूंची विक्री झाली असून, ६५,००० कोटी रुपये सेवा क्षेत्रातून आले आहेत.

**विक्रीत मोठी वाढः** गेल्या वर्षी दीपावलीच्या काळात ४.२५ लाख कोटी रुपयांची विक्री झाली होती. या तुलनेत यंदाच्या विक्रीने मोठी झेप घेतली आहे. कॅटच्या मते, जीएसटी दरांतील अलीकडच्या कपातीमुळे आणि ग्राहकांचा आत्मविश्वास वाढल्यामुळे यंदा विक्रमी विक्रीची नोंद झाली आहे. देशभरातील ६० प्रमुख वितरण केंद्रांच्या सर्वेक्षणातून ‘कॅट’ने हे आकडेवारी जाहीर केली आहे. यामध्ये राज्यांच्या राजधानीची शहरे तसेच द्वितीय आणि तृतीय श्रेणीतील शहरांचा समावेश आहे.



**लहान व्यापाऱ्यांचे मोठे योगदानः**

एकूण व्यापारात ८५ टक्के योगदान हे मुख्य प्रवाहातील किरकोळ विक्रीचे राहिले आहे, यात विशेषतः गैर-कॉर्पोरेट आणि पारंपरिक बाजारांचा समावेश आहे. ऑनलाइन खरेदीच्या जमान्यात लहान व्यापारी आणि प्रत्यक्ष बाजारपेठेने जोरदार पुनरागमन केल्याचे हे आकडे दर्शवतात.

**क्षेत्रनिहाय विक्रीची आकडेवारी :**

विक्रीच्या आकडेवारीत विविध क्षेत्रांनी महत्त्वपूर्ण

(पान २ वर)

## नम्र निवेदन

दीपावली पाडवा व भाऊबीज निमित्त प्रहार कार्यालयास बुधवार दि. २२ ऑक्टोबर व गुरूवार दि. २३ ऑक्टोबर रोजी सुट्टी असल्याने २३ व २४ ऑक्टोबरचा अंक प्रसिध्द होणार नाही. याची वाचक, विक्रेते, जाहिरातदार आणि हितचिंतकांनी नोंद घ्यावी.

\- **महाव्यवस्थापक**

# राज्यात शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवा पुस्तिकांचे डिजिटायझेशन

## ३ नोव्हेंबरपासून डेटा एन्ट्री, सर्व नोंदी एका क्लिकवर

**मुंबई (वृत्तसंस्था)**



राज्य शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवासंबंधी सर्व नोंदी पूर्णपणे डिजिटल करण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलले आहे. सामान्य प्रशासन विभागामार्फत ‘महा ई-ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट सिस्टिम’ या नव्या प्रणालीअंतर्गत प्रशासकीय विभागांतील कर्मचाऱ्यांच्या भौतिक सेवापुस्तिकांचे डिजिटायझेशन करण्यास सुरुवात करत आहे. त्यामुळे राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांचे नियुक्तीपासून सेवानिवृत्तीपर्यंतचे सर्व सेवाविषयक व्यवहार एकाच प्रणालीद्वारे एका क्लिकवर उपलब्ध होणार आहेत.

ही प्रक्रिया डिसेंबर २०२५ अखेर पूर्ण करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. पहिल्या टप्प्यात मंत्रालयीन प्रशासकीय विभागांतील अधिकारी व कर्मचारी, दुसऱ्या टप्प्यात विभागांच्या अधिनस्थ क्षेत्रीय कार्यालयांतील राज्य कर्मचारी आहेत. सेवापुस्तिकांचे डिजिटायझेशनही ४ टप्प्यांतून होणार आहे. राज्य शासकीय अधिकारी कर्मचारी एकूण ५ लाख ७० हजार असून जिल्हा परिषद स्तरावरील कर्मचारी मिळून १४ लाख ५० हजार आहेत.

**मुंबई-पुण्यात स्वतंत्र डेटा सर्व्हर**

हा डेटा मुंबई आणि पुणे या दोन्ही भूकंपप्रवण क्षेत्रात तसेच स्वतंत्र सर्व्हरवर संग्रहित केला जाणार आहे.

(पान २ वर)

## राज्यभरात पुढील ४ दिवस वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा

**मुंबई (प्रतिनिधी)**

देशभरातून नैऋत्य मोसमी पावसाने माघार घेतली असली, तरी आता बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे महाराष्ट्र पुन्हा एकदा अवकाळी पावसाच्या विळख्यात (पान २ वर)

# विकसित भारतासाठी अंतर्गत आणि बाह्य सुरक्षेचे संतुलन महत्त्वाचे!

## सैन्य आणि पोलीस दोघांचेही ध्येय समान: पोलीस स्मृतिदिनी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचे प्रतिपादन

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**



शहीद पोलीस कर्मचाऱ्यांच्या स्मरणार्थ देशभरात मंगळवारी पोलीस स्मृतिदिन साजरा केला गेला. यानिमित्ताने संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी मंगळवारी नवी दिल्लीतील चाणक्यपुरी येथील राष्ट्रीय पोलीस स्मारकात आयोजित पोलीस स्मृतिदिन कार्यक्रमात भाग घेतला आणि देशासाठी आपले प्राण अर्पण करणाऱ्या शूर पोलिसांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आपल्या भाषणात पोलीस आणि सैन्याच्या भूमिकेवर भर दिला. ते म्हणाले की, त्यांचे वेगवेगळे व्यासपीठ असूनही, राष्ट्रीय सुरक्षेचा विचार केला तर, सैन्य आणि पोलीस दोघांचेही ध्येय समान आहे आणि त्यांची भूमिका समान आहे. ते म्हणाले की, आज, भारत 'अमृतकाल' मध्ये प्रवेश करत असताना आणि आपण २०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न पाहत असल्याने, देशाच्या अंतर्गत आणि बाह्य सुरक्षेमध्ये संतुलन राखणे पूर्वीपेक्षा जास्त महत्त्वाचे झाले आहे.

संरक्षण मंत्री म्हणाले की, आज, पोलिसांना (पान २ वर)

# दिल्ली बनले जगातील सर्वात प्रदूषित शहर

## स्वित्झर्लंडमधील पर्यावरण संस्थेचा दावा



**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

दिवाळीत फटाक्यांच्या वापरानंतर दिल्ली जगातील सर्वात प्रदूषित शहर बनल्याचा दावा स्वित्झर्लंडची पर्यावरण संस्था आयक्यू-एअरने केला आहे.दिल्लीतील हवामानाची गुणवत्ता मंगळवारी अत्यंत धोकादायक पातळीवर पोहोचली होती आणि तिची मोजणी (रीडिंग) जगभरात सर्वाधिक होती असे आयक्यू-एअरने म्हंटले आहे.

आयक्यू-एअरच्या आकडेवारीनुसार, नवी दिल्लीसाठी प्रदूषणाचे मोजमाप ४४२ एक्यूआय होते, ज्यामुळे भारताची राजधानी जगातील सर्वात प्रदूषित महानगर ठरली. यामध्ये पीएम २.५ चे प्रमाण जागतिक आरोग्य संघटनेच्या (डब्ल्यूएचओ) वार्षिक मार्गदर्शक मर्यादेपेक्षा ५९ पट अधिक होते.

(पान २ वर)

# दोडामार्गच्या सीताराम राऊळ यांना वन्यजीव छायाचित्रणातील 'ऑस्कर'; ६६ हजार स्पर्धकांमध्ये बाजी

- 'वाईल्डलाईफ फोटोग्राफर ऑफ द इयर' पुरस्काराने गौरव
- बांदा येथील वटवाघळांच्या छायाचित्राला जागतिक सन्मान



**बांदा (प्रतिनिधी)**

कोकणच्या मातीतील सुपुत्र सिताराम राऊळ यांनी जागतिक स्तरावर भारताचा झेंडा अभिमानाने फडकवला आहे. लंडन येथील नॅचरल हिस्ट्री म्युझियमच्या ‘वाईल्डलाइफ फोटोग्राफर ऑफ द इयर २०२४-२५’ या प्रतिष्ठीत



स्पर्धेत त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

ही स्पर्धा म्हणजे वन्यजीव छायाचित्रकारांसाठी ‘फोटोग्राफीचा ऑस्कर’ मानली जाते. यंदा तब्बल ६६ हजार छायाचित्रकारांनी सहभाग घेतला होता. ११३ देशांमधून आलेल्या लाखो छायाचित्रांमधून सिताराम यांच्या कोकणातील बांदा गावात काढलेल्या वटवाघळांच्या अप्रतिम फोटोंना हा मानाचा पुरस्कार मिळाला आहे. ही संपूर्ण भारतासाठी अभिमानाची बाब आहे. (पान २ वर)

# श्री देव रामेश्वर, श्री देव नारायण यांचा आज पालखी सोहळा

## भाविकांनी मोठ्या उत्साहाने सहभागी व्हावे : देवस्थान ट्रस्टच्यावतीने आवाहन

**मालवण (प्रतिनिधी)**



मालवणचे ग्रामदैवत श्री देव नारायण आणि श्री देव रामेश्वर यांचा ऐतिहासिक पालखी सोहळा बलिप्रतिपदा म्हणजे दीपावली पाडव्या निमित्त आज २२ ऑक्टोबर रोजी दुपारी १ वाजता सुरू होणार आहे. भाविकांनी यात मोठ्या उत्साहाने सहभागी व्हावे, असे आवाहन श्री देव रामेश्वर, नारायण, सातेरी, देवस्थान ट्रस्ट च्यावतीने करण्यात आले आहे. मालवणचे ग्रामदैवत श्री देव रामेश्वर व श्री देव नारायण यांचा वार्षिक पालखी सोहळा २२ ऑक्टोबर रोजी दुपारी १ वाजता श्री देव रामेश्वर मंदिर येथून निघून श्री देव नारायण श्री देवी पावणाई, श्री देवी भावई श्री देवी सातेरी या सर्व देवतांना सांगणे करून आडवणमार्गे तानाजी नाका, श्री देव भूतनाथ मंदिर येथे थांबून


(पान २ वर)

# अल्पवयीन मुलांवरील लैंगिक गुन्ह्यात 'संमती' ग्राह्य नाही

- 'किरकोळ पेनिट्रेशन 'सुद्धा बलात्कार मानला जाणार
- लैंगिक शोषणाच्या बाबतीत मुंबई हायकोर्टाची कडक टिप्पणी

**मुंबई (वृत्तसंस्था)**

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्पष्ट केले आहे की, अल्पवयीन व्यक्तीविरुद्धच्या लैंगिक गुन्ह्यात अवयवाचा ‘थोडासा प्रवेश’ देखील बलात्कार मानला जातो आणि अशा प्रकरणात संमती अप्रासंगिक असते. याचा अर्थ असा की जरी अल्पवयीन व्यक्तीने संमती दिली तरीही तो बलात्कार मानला जाईल.



हा निर्णय पॉस्को (लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण) कायद्यांतर्गत मुलांना देण्यात आलेल्या संरक्षणाखाली देण्यात आला. वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथील ३८ वर्षीय ड्रायव्हरची अपील न्यायालयाने फेटाळून लावत, दोन अल्पवयीन मुलींवर (वय ५ आणि ६) लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल त्याला १० वर्षांची शिक्षा आणि ५०,००० रुपये दंड कायम ठेवला.

न्यायमूर्ती निवेदिता मेहता यांनी त्यांच्या निकालात म्हटले आहे की, एखाद्या व्यक्तीने अल्पवयीन मुलाच्या गुप्तांगात कोणत्याही अवयवाने प्रवेश केला की तो बलात्कार किंवा तीव्र लैंगिक अत्याचार मानला जातो. या प्रकरणात ‘पेनिट्रेशन खोली’ अप्रासंगिक आहे.

**मुलांना पेरूचे आमिष दाखवून बलात्काराचा प्रयत्न**

सरकारी वकिलांच्या म्हणण्यानुसार, आरोपींनी मुलांना पेरू देऊन आणि

(पान २ वर)

# पोलीस स्मृतिदिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून पोलीस हुतात्म्यांना अभिवादन

**मुंबई (वृत्तसंस्था)**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या वर्षभरात संपूर्ण देशात शहीद झालेल्या पोलीस हुतात्म्यांना नायगाव पोलीस मुख्यालय येथील पोलीस स्मृतिस्तंभावर पुष्पचक्र वाहून श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी मुंबई उपनगरचे सहपालकमंत्री मंगल प्रभात लोढा, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, बृहन्मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती, विविध देशांचे मुंबईतील वाणिज्यदूत व प्रतिनिधी, वरिष्ठ पोलीस अधिकारी व निमंत्रित यांनी देखील पोलीस स्मृतिस्तंभाजवळ जाऊन हुतात्म्यांना अभिवादन केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या संदेश वाचनातून गेल्या वर्षभरात देशात हौतात्म्य प्राप्त (पान २ वर)

# नवी मुंबईत शोककळा

## लक्ष्मीपूजनादिवशी आगीच्या दोन घटनांमध्ये तब्बल ६ जणांचा मृत्यू

**नवी मुंबई**

सध्या देशभरात दिवाळीचा उत्साह पाहायला मिळत असून दुसऱ्या दिवशी म्हणजेच मंगळवारी (२१ ऑक्टोबर) लक्ष्मीपूजनाची लगबग पाहायला मिळत आहे. पण, याचदिवशी नवी मुंबईतील कामोठे परिसरात पहाटे एका इमारतीमध्ये आग लागल्याचे समोर आले.

(पान २ वर)